**L. C. BILL No. V OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIES ACT, 1961.

## सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५.

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९६२ चा महा. ५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

(शा.म.मु.) एचबी १६७३–१ (६००—१२-२०२१)

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम ९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मध्ये, " जास्तीत जास्त पंचाहत्तर आणि कमीत कमी पन्नास इतके " या मजकुराऐवजी, " पंचाऐंशी पेक्षा अधिक नसतील आणि पंचावन्न पेक्षा कमी नसतील इतके " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९६२ चा महा. ५.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम ९ मध्ये, राज्य निवडणूक आयोग, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ठरवील असे पंचाहत्तर पेक्षा अधिक नसतील आणि पन्नास पेक्षा कमी नसतील इतक्या, जिल्ह्यातील मतदार विभागांद्वारे प्रत्यक्ष निवडून द्यावयाचे परिषद सदस्यांचा जिल्हा परिषदेमध्ये समावेश असेल अशी तरतूद आहे, तथापि, जिल्हा परिषदेच्या प्रादेशिक क्षेत्राची लोकसंख्या आणि अशा जिल्हा परिषदेमधील, निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांची संख्या, यांमधील गुणोत्तर, व्यवहार्य असेल तेथवर संपूर्ण राज्यभर सारखेच असेल.

**२.** प्रत्यक्ष निवडून द्यावयाच्या परिषद सदस्यांची कमाल व किमान संख्या १९९० या वर्षामध्ये वाढवलेली आहे. राज्यातील ग्रामीण क्षेत्राच्या लोकसंख्येमध्ये मागील तीस वर्षांमध्ये वाढ झालेली आहे. ग्रामीण क्षेत्रातील लोकसंख्येची वाढ विचारात घेता, जिल्हा परिषदेमध्ये ग्रामीण लोकसंख्येस पर्याप्त प्रतिनिधित्व मिळण्यासाठी तरतूद करणे इष्ट वाटते, आणि म्हणून, निवडून द्यावयाच्या परिषद सदस्यांच्या संख्येत वाढ करण्याचे प्रस्तावित केले असून ती संख्या पंचाऐंशी पेक्षा अधिक नसेल व पंचावन्न पेक्षा कमी नसेल. म्हणून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम ९ मध्ये यथोचित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १६ डिसेंबर, २०२१.

**हसन मुश्रीफ,**
ग्रामविकास मंत्री.

## सन २०२१ चे वि.प. विधेयक क्रमांक ५-महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट.

## (महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यातील उतारे)

## (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.)

**१. ते ८.** ** ** **

जिल्हा परिषदांची रचना.

**९.** (१) जिल्हा परिषद पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल-

(अ) राज्य निवडणूक आयोग **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ठरवील असे, जास्तीत जास्त पंचाहत्तर आणि कमीत कमी पन्नास इतके, जिल्ह्यातील निवडणूक विभागातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडण्यात आलेले परिषद सदस्य; तथापि, वाजवीरीत्या व्यवहार्य असेल तेथवर जिल्हा परिषदेच्या प्रादेशिक क्षेत्राची लोकसंख्या आणि अशा जिल्हा परिषदेमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांची संख्या यांमधील गुणोत्तर संपूर्ण राज्यभर सारखेच असेल.

(ब) ** ** **

(२) व (३) ** ** **

**९.अ. ते २९०.** ** ** **

**अनुसूची** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५.]**

**[ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. हसन मुश्रीफ,**
ग्रामविकास मंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई